| MHBI090013262023 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २८/०८/२०२३ |
| | नोंदणी तारीख | २९/०८/२०२३ |
| | निकाल तारीख | ०५/०५/२०२६ |
| | कालावधी | वर्ष महिने दिवस<br>०२ ०८ ०६ |

| | |
|---|---|
| | **प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,(न्यायालय क्र.१), माजलगांव यांचे न्यायालयात**<br>**( पिठासीन अधिकारी—आर.बी.पोळ )**<br><br>**नि.फौ.खटला क्र.२०९/२०२३ नि.क्र. ३७/ब** |
| | गुन्हा नोंदणी क्र. २०३/२०२३ पो.स्टे. माजलगांव शहर |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन |
| **द्वारे प्रतिनिधी** | **श्री.जे.बी.शिंदे, सरकारी अभियोक्ता.** |
| **आरोपी** — | सुभाष भानुदास साळवे,<br>वय— ५५ वर्षे,<br>रा. भिमनगर, माजलगांव, ता. माजलगाव, जि.बीड. |
| **द्वारे प्रतिनिधी** | **आरोपी तर्फे श्री. एम.ए. डोंगरदिवे विधीज्ञ.** |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १४/०६/२०२३ |
| गुन्हा नोंद केल्याची तारीख | १४/०६/२०२३ |
| दोषारोपपत्र दाखल झाल्याची तारीख | २३/०८/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | २६/०८/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | २२/०४/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी ठेवल्याची तारीख | ०५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०५/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावली असल्यास तारीख | —— |

आरोपीचा तपशील

| अ. क्र. | आरोपींचे नाव | अटकेची तारीख | जमीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोपाचे कलम | निर्दोष की दोषी | सुनावण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षे दरम्यान स्थानबध्दतेत गेलेला कालावधी फौ.प्र.सं. ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुभाष भानुदास साळवे | १४/०६/ २०२३ | १४/०६ /२०२३ | भा.दं.वि. चे कलम ३२४, ५०४, ५०६ सह भा.ह.का. ४/२५ | निर्दोष | —— | —— |

अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ. क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप | नि.क्र. |
|---|---|---|---|
| १ | सुनिता भागवत स्वामी | फिर्यादी | २७ |
| २ | स्वप्नील भागवत स्वामी | साक्षीदार | ३३ |

आरोपींनी पुरावा दिलेला नाही. न्यायालयाचा साक्षीदार नाही.

अभियोग पक्षातर्फे देण्यात आलेले निशाणी क्रमांक

| अ.क्र. | वर्णन | नि.क्र. |
|---|---|---|
| १ | फिर्यादवरील सही | २८ |

महत्वाचा वस्तुजन्य पुरावा

| अ.क्र. | महत्वाचा वस्तुजन्य पुरावा | वर्णन |
|---|---|---|
| | —— | —— |

**—: न्यायनिर्णय :—**

**(पारीत दिनांक ०५/०५/२०२६)**

आरोपीने या कामी भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ व भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह २५ प्रमाणे गुन्हा केल्याचा आरोप आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे</u> :—**

२. फिर्यादी सुनिता भागवत स्वामी यांचे कथनानुसार दिनांक १४/०६/२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजता तीचा नातु नामे प्रभास स्वप्नील स्वामी वय—०२ वर्ष हा रडत असल्याने फिर्यादी ही तीच्या नातवाला घेऊन तीची मैत्रीन नामे रेखा दिनेश धायजे हीचे घरी जात असताना तीच्या गल्लीतील सुभाष भानुदास साळवे हा दारु पिऊन हातात लोखंडी कत्ती घेऊन मोठ मोठ्याने शिविगाळ करून तीच्या पाठिमागे कत्ती घेऊन आंगावर धाऊन गेला. त्यावेळी फिर्यादीने आरडाओरड केल्यानंतर किशोर रमेश सोनपसारे, कपिल श्रीहरी माघमारे, भैय्या दिपक निसर्गन, शाहु रमेश सोनपसारे, चतुराबाई उद्धव स्वामी असे तीच्याकडे आले. त्यानंतर सुभाष साळवे हा त्याचे घरामध्ये गेला. त्या नंतर त्यांनी सुभाष साळवे यास लोखंडी कत्ती सह पोलिस स्टेशन माजलगाव शहर येथे नेले. त्यानंतर फिर्यादीला माजलगाव शहर पोलिसांनी सरकारी दवाखाना माजलगाव येथे उपचार कामी पत्र देऊन पाठविले. त्यानंतर फिर्यादीने झालेला प्रकाराबाबत पोलीस ठाणे माजलगांव शहर येथे आरोपीविरूध्द फिर्याद दिली. सदरची फिर्याद गु.र.क्र.२०३/२०२३, भा.द.वि कलम ३२४, ५०४, ५०६ व भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह २५ अन्वये नोंदविण्यात आला.

**३.** सदर गुन्हयाचा तपास सहाय्यक पो.ना. जी.एस. नांगरे यांनी केला व तपास पूर्ण झालेनंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरूध्द **<u>नि.क्र.२१</u>** ला गु.र.क्र.२०३/२०२३, भा.द.वि कलम ३२४, ५०४, ५०६ व भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह २५ प्रमाणे दोषारोप निश्चित केले. सदर दोषारोपामधील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगीतला असता आरोपीने गुन्हा नाकबूल केला. त्याबाबतचा त्यांचा जबाब **<u>नि.क्र.२०</u>** वर नोंदविलेला आहे. अभियोग पक्षाच्या पुराव्यामध्ये आरोपीविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र. ३६ वर नोंदविण्यात आले.

५. अभियोग पक्षाचा व बचाव पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**६.** याकामी उपस्थित होणारे मुद्दे त्यावरील निष्कर्ष व कारणांसहीत खालीलप्रमाणे नोंदविले आहे : —

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दि. ०४/०६/२०२३ रोजी १०.०० वाजण्याचे दरम्यान भिमनगर, माजलगांव येथे आरोपीने दारूच्या नशेत विनाकारण फिर्यादीचे अंगावर धावत जावून फिर्यादीचे डोक्यात व गळ्यावर लोखंडी कत्तीने मारहान करून इच्छापुर्वक गंभीर दुखापत केली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ३२४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ..नाही. |
| २ | अभियोग पक्षाने पुढे हे सिध्द केले आहे काय कि, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस विनाकारण शिवीगाळ केली व त्यांचा उद्येशपूर्वक अपमान केला. ज्यामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा व अन्य कोणताही अपराध घडावा यासाठी त्यांना त्याद्वारे प्रक्षोभित केले. व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०४ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ..नाही. |
| ३ | अभियोग पक्षाने पुढे हे सिध्द केले आहे काय कि, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे भारतीय दंड संहिता कलम ५०६ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ..नाही. |
| ४ | अभियोग पक्षाने पुढे हे सिध्द केले आहे काय कि, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपी हा सार्वजनिक ठिकाणी विना परवाना बेकायदेशीररित्या धारदार शस्त्र जवळ बाळगत असतांना मिळून आले व त्यायोगे भारतीय हत्यार कायद्यान्वये कलम ४ सह कलम २५ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का ? | ..नाही. |
| ५ | आदेश कोणते ? ... | आरोपीची निर्दोष मुक्तता केली. |

७. आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सा.क्र.१ सुनिता भागवत स्वामी यांची साक्ष नि.क्र. २७ व सा.क्र. २ स्वप्नील भागवत स्वामी यांची साक्ष नि.क्र. ३३ वर नोंदविण्यात आली. त्यानंतर नि.क्र.१ वर आदेश करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

## —: <u>कारणमिमांसा</u> :—

### <u>मुद्दा क्र. १ ते ३ बाबत</u> :—

८. मुददा क्र. १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने ते एकत्रितरित्या विचारात घेण्यात आले आहेत.

९. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेला फिर्यादी सा.क्र. १ फिर्यादी सुनिता भागवत स्वामी यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, ती आरोपीला ओळखते, तो तीच्या शेजारी राहतो. घटना दिनांक १४/०६/२०२३ रोजी तीच्या घराच्या समोर १०.४५ च्या दरम्यान झाली होती. त्यावेळी आरोपी दारू पिलेला होता त्यामुळे त्यांच्यात किरकोळ कारणावरून बाचाबाची झाली होती. त्यामुळे तीने रागाच्या भरात माजलगांव शहर पो.स्टे. येथे फिर्याद दाखल केली होती. सदरची फिर्याद फिर्यादीला दाखवली असता त्यावर त्यांची सही असुन मजकुर अमान्य केला. साक्षीदाराच्या सहीस नि.क्र. २८ देण्यात येते.

१०. सा.क्र. १ च्या सरतपासाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ती अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नाही परंतु अभियोग पक्षाने उलटतपासाच्या माध्यामातुन प्रश्न विचारले असता सा.क्र. १ कथन करते की, झटापटीमध्ये तीचे डोक्याला जखम झाली होती व पोलीसांनी तीचा पुरवणी जबाब नोंदवून घेतला होता. सदरचा पुरवणी जबाब नि.क्र. २९ कडे सिध्द करण्यात आलेला आहे. त्याचप्रमाणे ती कथन करते की, सदरची फिर्याद आरोपीने मारहाण केल्यामुळे तीने दाखल केली होती व त्यावेळी पोलीसांनी तीला फिर्याद वाचून दाखवली होती. सा.क्र. १ ने नि.क्र. ३० कडे सदरची फिर्याद सिध्द केलेली आहे. आरोपीचे विधिज्ञ श्री. एन.ए. डोंगरदिवे यांनी सा.क्र. १ चा उलटतपास घेतला असता ती कबूल करते की, रागाच्या भरात तीने फिर्याद दिली होती. परंतु पोलीसांनी सदरची फिर्याद तीला वाचून दाखवली नाही. तसेच ती मान्य व कबूल करते की, घटनेच्या वेळी आरोपीकडे कत्ती नव्हती.

**११.** फिर्यादीच्या कथनास पुष्ठी देण्याकामी अभियोग पक्षाने सा.क्र. २ म्हणुन फिर्यादीचा मुलगा नामे स्वप्नील भागवत स्वामी यास नि.क्र. ३३ वर तपासले. सा.क्र. २ याने त्याच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी ही त्याची आई आहे. घटना सन २०२३ मध्ये सकाळी त्यांच्या घरासमोर झाली होती. त्यावेळी तो बॅकेमध्ये होता. त्याला त्याच्या मित्राचा फोन अज्ञल्ज्ञ की, घरासमोर गोंधळ चालु आहे तु लवकर ये. त्यामुळे तो घरी आला. घरासमोर गर्दी असल्याचे त्याला दिसले. लहान मुलाच्या कारणावरून आरोपीसोबत तीच्या आईची कुरबुर झाल्याचे त्याला समजले. याव्यतिरिक्त काहीही झाले नाही. पोलीसांनी त्याचा जबाब घेतला होता किंवा कसे हे त्याला आठवत नाही. सदर साक्षीदारांने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. अभियोगपक्षातर्फे सदर साक्षीदारांस उलट तपासाच्या स्वरूपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. सदर सा.क्र.२ हा अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नाही. अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने फिर्यादीचे डोक्यात व गळ्यावर लोखंडी कत्तीने मारहान करून गंभीर दुखापत केली व फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. साक्षीदाराने ने ही बाब स्पष्टपणे नाकारली आहे.

**१२.** अभियोग पक्षाने दाखल केलेले तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र. १ ही तीचे सरतपासामध्ये अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नाही परंतु आरोपीने तीला मारहाण केल्याचे ती तीचे अभियोग पक्षाने घेतलेल्या तीच्या उलटतपासात कथन करत आहे. तसेच आरोपीचे विधिज्ञ यांनी घेतलेल्या उलटतपासामध्ये ती पुन्हा तीचे मौखिक पुराव्यापेक्षा वेगळे कथन करत असून आरोपीच्या हातामध्ये घटनेच्या वेळी कत्ती नसल्याचे ती कथन करत आहे. तसेच रागाच्या भरात तीने सदरची फिर्याद दिल्याचे कथन करत आहे. वास्तविक पाहता सा.क्र. १ तीचे अभियोग पक्षाने घेतलेल्या उलटतपासामध्ये कथन करत आहे की, झटपटीमध्ये तीच्या डोक्याला मार लागला होता परंतु सदरचा मार कोणत्या परिस्थितीमध्ये लागला होता याबाबत ती स्पष्टपणे कथन करत नाही. तसेच दिनांक १४/०६/२०२३ रोजी आरोपी दारू पिउन, हातात लोखंडी कत्ती घेवुन तीचे अंगावर धावुन आल्याचे ती नाकारत आहे. अशा परिस्थितीत सा.क्र. १ च्या मौखिक पुराव्याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच सा.क्र. २ हा सदर घ टनेचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याचे अभियोग पक्षाचे कथन आहे परंतु तो त्याचे तोंडी पुराव्यात अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा देत नाही. सा.क्र. २ हा सा.क्र. १ चा मुलगा असताना देखील तो अभियोग पक्षाच्या कथनाला सहाय करत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे अभियोग पक्षाच्या कथनाबाबत साशंकता निर्माण होते.

**१३.** प्रस्तुतचा खटला सिध्द करत असताना अभियोग पक्षाने कोणताही स्वतंत्र साक्षीदार संपरिक्षेत तपासलेला नाही. तसेच सा.क्र. १ व २ यांचे मौखिक पुराव्यामध्ये विरोधाभास दिसत असून सा.क्र. १ च्या विश्वासार्हतेबाबत शंका उपस्थित होते. अभियोग पक्षाने आरोपीविरूध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये आरोपीविरूध्द दोषारोप ठेवलेल आहे परंतु अभियोग पक्षाने प्रस्तुत गुन्हयात जप्त करण्यात आलेली लोखंडी कत्ती अभिलेखावर दाखल केलेली नाही. तसेच सदर कत्ती भारतीय हत्यास कायदयाचे कलम ४/२५ चे परिसिमेत येते किंवा कसे याबाबत देखील शंका उपस्थित होत असल्याने अभियोग पक्षाने प्रस्तुतची घटना शंकेपलीकडे सिध्द केला नसल्याचे दिसून येते. सबब, मी मुद्दा क्र. १ ते ४ करीता नकारार्थी निष्कर्ष नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता :—</u>**

**१४.** मुद्दा क्र. १ ते ४ करीता दिलेल्या नकारार्थी निष्कर्षान्वये आरोपीं विरुध्द लावण्यात आलेल्या गुन्हयांचे आरोप नि:संशयरित्या सिध्द होत नाहीत असे दिसुन येते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**—: <u>आदेश</u> :—**

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधान कलम ३२४, ५०४, ५०६ व भारतीय हत्यार कायदा कलम ४ सह २५ या गुन्हयामधून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी संहिता कलम ४३७ (अ) प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/— चे वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

४. सदर प्रकरणातील मुद्देमाल एक लोखंडी कत्ती मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावी.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.05.05 17:15:24 +0530

**दि.०५/०५/२०२६.** **( आर. बी. पोळ )**
**स्थळ: माजलगांव** **१ले प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, माजलगाव.**

:: **Certificate of Stenographer** ::

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment."

Dictated On : 05/05/2026.

Transcribed On : 05/05/2026.

Checked & Signed On : 05/05/2026.

Date : 05/05/2026.

Place : Majalgaon

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GUPTA SACHIN SATISH
Date: 2026.05.05 17:23:00 +0530

**( Sachin S. Gupta )**
Stenographer (Grade – 2)
Jt. Civil Court S.D. & Addl. C.J.M.
Majalgaon